# ग्राहक गाऱ्हणे निवारण मंच

(विद्युत कायदा, २००३ अंतर्गत कलम ४२ (५) अन्वये स्थापित)

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### जळगाव परिमंडळ


दुरध्वनी क्र. ०२५७ – २२७३००४
Email :-cgrfjalgaonzone@gmail.com
cejalgaon@mahadiscom.in.
cgrfjalgaon@mahadiscom.in

ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
जुनी एम.आय.डी.सी.
महावितरण विश्राम गृहाजवळ,
अंजिठा चौफुली जळगाव. ४२५००३


जा.क्रः स.स./ग्रागानिमं/जप/ज.मं./जळगाव/०४–२०१७–१८/ No 000721 दिनांकः 21 NOV 2017

(रजिष्टर पोच व्दारे)

गाऱ्हाणे दाखल दिनांकः २८/०९/२०१७
निकाल दिनांक : २१/११/२०१७

प्रति,

१. सिध्दार्थ कार्बोकेम प्रोडक्टस लिमीटेड.
ई–३,एम.आय.डी.सी.
मु.पो.ता.जळगाव. जि.जळगाव
(ग्राहक क्र. ११०१०००८११५) — तक्रारदार

२. नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण कंपनी.मर्या.
विद्युत भवन, मंडळ कार्यालय, जळगाव.

३. कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण.कंपनी.मर्या.
विभागिय कार्यालय,जळगाव. — विज वितरण कंपनी

(सचिव तथा कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या., जळगांव, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच)

## निर्णयपत्र

सिध्दार्थ कार्बोकेम लिमीटेड, ई–३,एम.आय.डी.सी मु.पो.ता.जळगाव. जि.जळगाव हे विज वितरण कंपनीच्या एल टी इंडस्ट्रीयल प्रवर्गातील ग्राहक आहेत. त्यांनी दि.३१.१२.२०१६ रोजी अंडरप्रोटेस्ट जमा केलेले ट्रान्सफार्मर परत मिळणेबाबत अथवा ट्रान्सफार्मरची आजचे बाजार भावाप्रमाणे किंमत रक्कम रू. ३,००,०००/– परतावा व्याजासह मिळण्याबाबत योग्य ती कार्यवाही होवुन न्याय मिळण्याविषयी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली. मात्र अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडुन दिलेला निकाल त्यांना मान्य नसल्याने ग्राहकाने आपले गाऱ्हाणे अनुसुची 'अ' मध्ये मंचाकडे सादर केले. ते मंचाकडे आवक क्रमांक ७२ अन्वये दि. २८.०९.२०१७ रोजी नोंदविण्यात आले.

मंचाचे सदस्य–सचिव व सदस्य यांनी आपसात सल्लामसलत करून हे प्रकरण सुनावणीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला. गाऱ्हाणे अर्जाची सुनावणी मंचाच्या कार्यालयात दि.३१.१०.२०१७ रोजी स. ११.०० वाजता निश्चित करण्यात आली. या संबंधीची सुचना तक्रारदार ग्राहक व वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्याना दि.०४.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली. याच पत्रासोबत तक्रार अर्जाची प्रत नोडल अधिकारी, जळगाव मंडळ कार्यालय, जळगाव व कार्यकारी अभियंता,जळगाव विभाग यांना देवुन तक्रार अर्जानुसार मुद्देनिहाय अभिप्राय १५ दिवसाच्या आत मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोचविण्याबाबत सुचित करण्यात आले.

सुनावणीस विद्युत वितरण कंपनीच्या जळगाव प्रविभाग कार्यालयाकडुन उपकार्यकारी अभियंता श्री आर.एफ. पवार, तसेच जळगाव विभागीय कार्यालयाकडुन कार्यकारी अभियंता श्री.संजय तडवी, व श्री आर.व्ही.गणगणे, उपकार्यकारी अभियंता हे उपस्थित होते. तर ग्राहकाच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी म्हणुन श्री जितेंद्र सुभाष वाणी हे उपस्थित होते. मंचाचे अध्यक्ष श्री.सुरेश वाघ यांचा कार्यकाल संपलेला असल्यामुळे त्यांची जागा रिक्त आहे. मात्र दोन सदस्य हजर असल्याने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील विनियम ५.२ नुसार गणपूर्ती होत असल्याने सुनावणी घेण्यात आली.

**ग्राहकाची बाजु :-**

१. तक्रारदार कंपनी रासायनिक उत्पादने तयार करणारी कंपनी असुन मागील २५ पेक्षा जास्त वर्षापासुन ई-३, एम. आय.डी.सी, जळगाव सदर व्यवसाय करते. सुरवातीस कंपनीचे उत्पादन मर्यादित असल्यामुळे कंपनीच्या गरजेप्रमाणे कंपनीने म.रा.वि.वि.कं. यांचेकडून ११०१०००८११५ या ग्राहक क्रमांकाने ६५ HP लघुदाब विज पुरवठा घेतलेला होता. तक्रारदाराने सदरील कनेक्शनची विज वापराची विजबीले नियमीतपणे भरलेली होती व आहे. तक्रारदाराकडे आजरोजी म. रा.वि.वि.कं. ची कोणतीही रक्कम विजबीलापोटी थकित नाही.

२. तक्रारदार कंपनीचे व्यवसायीक उत्पादनात वाढ झाल्यामुळे कंपनीने यापुर्वी नमुद केल्याप्रमाणे म.रा.वि.वि.कं यांचे कडुन ११००१०००८११५ या ग्राहक क्रमांकाने घेतलेला लघुदाब विजपुरवठा पुरत नसल्यामुळे त्याचप्रमाणे सदर लघुदाब पुरवठ्यावर जास्त ताण पडत असल्यामुळे व त्यामुळे नेहमी काही ना काही तांत्रिक बिघाड होत असल्यामुळे सदरील तक्रारदार कंपनीने अधिकचा १३५ HP पुरवठा घेण्याचे ठरविले.

३. सदर तक्रारदार यांना अधिकचा १३५ HP पुरवठा आवश्यक असल्यामुळे तक्रारदार यांनी सामनेवालाच्या मागणी व आवश्यकते नुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रांची तसेच मागणी केल्याप्रमाणे डिमांड्नोटची पुर्तता केली. सदर लघुदाब पुरवठा सदरील तक्रारदार यांनी सामनेवाला यांचेकडे वारंवार पाठपुरावा केल्यानंतर अखेर म.रा.वि.वि.कं यांनी दि.२१.०९.२००६ रोजी ईई/यु.सि.आर/जे.एल.जी/टी-२ नं ९०८५ या पत्राद्वारे तक्रारदाराच्या मागणीप्रमाणे अधिकचा १३५ HP विजपुरवठा मंजुर केल्याचे कळविले. त्याचप्रमाणे सामनेवाला यांनी त्यासाठी तक्रारदारास स्वत:चे ट्रान्सफार्मर विकत घ्यावे लागेल असे देखील सांगितले. प्रत्यक्षात ट्रान्सफार्मर बसविणे हे म.रा.वि.वि.कं यांचेच काम असतांना देखील सामनेवाला यांनी तक्रारदार यांस खर्चात टाकुन नवीन ट्रान्सफ़ार्मर विकत घेण्यास भाग पाडले. त्याप्रमाणे तक्रारदाराने सामनेवालाच्या आवश्यकतेप्रमाणे त्यांनी दिलेल्या सर्व आवश्यक बार्बीची पुर्तता केली व एमको लिमीटेड,जळगाव या कंपनी कडुन २००KVA कॅपॅसिटी असलेले ट्रान्सफ़ार्मर दि.३०.०१.२००९ रोजी विकत घेतले. तक्रारदाराने स्वत: डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफ़ार्मर विकत घेण्यासाठी परचेस ऑर्डर दिली व विकत घेतले. सदरील डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफ़ार्मर चे तक्रारदाराने दि.१२.११.२००८ रोजी परचेस ऑर्डर दिल्याचे व्हाऊचर नं पी.ओ/९२/०८-०९ सदरील तक्रार अर्जासोबत दाखल करीत आहे. तसेच दि.३०.०१.२००९ रोजीचे इनव्हाईस नं. जे.ए.एन.-४८/०८०९ देखील सदरील अर्जासोबत दाखल करीत आहे. त्यानंतर तक्रारदाराचे कंपनीत सामनेवाला यांनी तक्रारदाराने विकत घेतलेले ट्रान्सफ़ार्मर बसवुन दिले. सदर ट्रान्सफ़ार्मर बसविल्यांनतर आजपर्यंत तक्रारदार यांनी सामनेवाला यांचे सर्व बिले अदा केलेली आहेत.

४. तक्रारदार कंपनीचे व्यवसायात, उत्पादनात वाढ झाल्यामुळे कंपनीने यापुर्वी नमुद केल्याप्रमाणे म.रा.वि.वि.कं यांचेकडुन ११००१०००८११५ या ग्राहक क्रमांकाने घेतलेला लघु दाब विजपुरवठा पुरत नसल्यामुळे त्याचप्रमाणे सदर लघुदाब पुरवठ्यावर जास्त ताण पडत असल्यामुळे व त्यामुळे नेहमी काही ना काही तांत्रिक बिघाड होत असल्यामुळे सदरील तक्रारदार कंपनीने उच्च दाब पुरवठा घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे आवश्यकता असलेली सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता म.रा.वि.वि.कं यांच्या आवश्यकते प्रमाणे पुर्ण केली. तदनंतर तक्रारदार कंपनीस नवीन उच्च दाब विजपुरवठ्याच्या क्षमतेनुसार दुसरे आवश्यक ते ट्रान्सफ़ार्मर बसविणे आवश्यक असल्यामुळे सदरील वादातील ट्रान्सफ़ार्मर म.रा.वि.वि.कं यांनी तक्रारदारास म.रा.वि.वि.कं यांचेकडे जमा करण्यास सांगितले व तसे न केल्यास तक्रारदार कंपनीवर फ़ौजदारी गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली.

५. तक्रारदाराने विकत घेतलेले तक्रारदाराच्या मालकी असलेले सदरील डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफ़ार्मर म.रा.वि.वि.कं यांनी तक्रारदारास म.रा.वि.वि.कं यांचेकडे जमा करण्यास सांगितले व त्यासाठी वेग वेगळ्या माध्यमातुन तक्रारदारावर दबाव देखील आणला वास्तविकत: सदरील डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफ़ार्मर हे तक्रारदाराच्या मालकीचे असल्यामुळे सदरील डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफ़ार्मर म.रा.वि.वि.कं यांचेकडे जमा करण्याचा कोणताही प्रश्न उद्‌भवत नव्हता परंतु तरीदेखील म.रा.वि.वि.कं यांचे अधिकाऱ्यांनी बेकायदेशिर रित्या सदरील ट्रान्सफ़ार्मर जमा करावयास लावले. म्हणुन तक्रारदाराने सरतेशेवटी दि.३१.१२.२०१६ रोजी अंडरप्रोटेस्ट सदरील ट्रान्सफ़ार्मर म.रा.वि.वि.कं यांचेकडे जमा केले.

६. सामनेवाला म.रा.वि.वि.कं यांनी वरील प्रमाणे अनुचित व्यापारी प्रथेचा अवलंब केल्यामुळे तसेच त्यामुळे तक्रारदाराचे आर्थिक नुकसान होत असल्यामुळे तसेच तक्रारदारास व संचालक मंडळास मानसिक त्रासास सामोरे जावे लागत असल्यामुळे सामनेवाला म.रा.वि.वि.कं यांच्या सदर बेकायदेशिर कृत्यास कंटाळून तक्रारदार सदरील तक्रार या प्राधिकरणाकडे दाखल करावा लागत आहे.

**ग्राहकाच्या मागण्या :**

१. अंतर्गत गाऱ्हाणे निवारण कक्षाने दि. २८.०८.२०१७ रोजी दिलेल्या आदेश रद्द करण्यात येवुन तक्रारदाराचा तक्रार अर्ज मंजुर करण्यात यावा.

२. सामनेवाला म. रा.वि.वि.कं.मर्यादित यांनी तक्रारदाराकडुन बळजबरीने व फ़ौजदारी गुन्हा दाखल करण्याची धमकी देवुन बेकायदेशिर रित्या जमा केलेले ट्रान्सफ़ार्मर नं ४७४४६ सामनेवाला यांनी तक्रारदारास परत देण्याचे आदेश सामनेवाला यांना व्हावेत.

३. विकल्पेकरुन सदर ट्रान्सफ़ार्मरची आजचे बाजार भावाप्रमाणे किंमत रक्कम रु.३,००,०००/- सामनेवाला यांनी तक्रारदारास अदा करण्याचे आदेश सामनेवाला यांना व्हावेत.

४. सामनेवाला यांनी अवलंबिलेल्या अनुचित व्यापारी प्रथेमुळे, तक्रारदार यांना झालेला मानसिक त्रासाबद्दल सामनेवाला कडुन तक्रारदारास नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रुपये ५०,०००/- मिळावेत.

५. तक्रारदारास या तक्रारीचा खर्च रुपये ५०,०००/- सामनेवाले यांचेकडुन द्यावे.

६. तक्रारदाराच्या हिताचे व न्यायाचे अन्य इतर योग्य ते हुकुम व्हावेत ही विनंती.

**मे.सिध्दार्थ कार्बोकेम प्रा.लि.यांचे दि. ०९/११/२०१७ रोजीचे निवेदन :-**

१. सदर तक्रार अर्जाकामी आजरोजी तक्रारदारांचा अतिरीक्त खुलासा देणेसाठी तारीख नेमलेली आहे. सदर कामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांनी दिलेल्या खुलाश्यात तक्रारदाराने त्यांना करारनामा करुन दिलेला आहे, असे नमुद केलेले आहे, परंतु करारनामा अभिलेखावर दाखल केलेले नाही. तक्रारदाराकडे उपलब्ध असलेल्या माहिती व कागदपत्रांवरुन तक्रारदाराने कोणताही करारनामा करुन दिलेला दिसुन येत नाही. किंवा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांनी देखील त्यांचा खुलासा दाखल करतांना केवळ योग्य तो करारनामा करुन दिलेला आहे. असे मोघम स्वरुपात नमुद केलेले आहे. सामनेवाला यांनी खुलाश्या सोबत तथाकथित करारनामा दाखल केलेला नाही.

२. सदर तक्रारीचे कामे सामनेवाला यांनी करारनामा बाबत नवीन विषय उपस्थित केल्यामुळे सदर तक्रारीचे गुणवत्तेवर न्याय निर्णय होणेसाठी सामनेवाला यांनी सदर चा तथाकथित करारनामा हजर करणे गरजेचे आहे. सदर कामी तक्रारदाराने मागणी करुन ही तथाकथित करारनाम्याची प्रत पुरवण्यात आलेली नाही. तसेच अभिलेखेवर देखील सादर करण्यात आलेली नाही. करारनाम्याप्रमाणे वादातील ट्रान्सफ़ार्मरची मालकी सामनेवाला यांची झाल्याचे सामनेवाल्याचे म्हणने असल्यामुळे सदर बाब शाबीत करण्याची जबाबदारी देखील सामनेवाला यांचीच आहे. परंतु सामनेवाला यांनी करारनामा हजर केलेला नसल्यामुळे सदर बाब शाबीत झालेली नाही. तसेच सामनेवाला यांनी त्यांच्या खुलाशात नमुद केल्याप्रमाणे दिलेली परिपत्रकांची सत्य प्रत स्पष्ट असुन वाचण्याजोगी नाही. तसेच सदरील परिपत्रकावरुन असा कोणतही बोध होत नाही की सदरील ग्राहकाने विकत घेतलेले विज जोडणीसाठी लागणारे ट्रान्सफ़ार्मर हे महावितरण व पुर्वीचे मंडळाकडे हस्तांतरीत होईल. तसेच सामनेवाला त्यांचे खुलाशात स्पष्टपणे नमुद करतात की, ग्राहकांचा करारनामा सद्यस्थितीत या कार्यालयात उपलब्ध नाही. सामनेवाला मे. मंचाची दिशाभुल करण्यासाठी त्यांच्या खुलाश्यात नमुद करतात की, सदर घटणा ही दोन वर्षापुर्वीची आहे. परंतु सत्य परिस्थिती अशी की, सदरील घटना ही ३१.१२.२०१६ रोजी तक्रारदाराने अंडरप्रोटेस्ट २०० केव्हीए एल टी ट्रान्सफ़ार्मर एम.एस.इ.डी.सी.एल यांचेकडे जमा केले. तेव्हापासुन सदरील तक्रार अर्ज दाखल करण्यास घडलेले आहे. सदरील घटना घडलेपासुन दोन वर्षाचे आतच सदरील तक्रार अर्ज तक्रारदाराने मे.मंचासमक्ष दाखल केलेला आहे.

**वितरण कंपनीची बाजु :-**

वितरण कंपनीचे संबंधीत कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय जळगाव यांनी त्यांचे पत्र क्र.४९९६ दि.३१.१०.२०१७ अन्वये पत्रव्यवहार मंचापुढे सादर केला त्यात त्यांनी त्यांची बाजु खालील प्रमाणे मांडलेली आहे.

तक्रारदार मे.सिध्दार्थ कार्बोकेम प्रा.लि.यांनी महावितरण कडुन ग्रा.क्र.११००१०००८११५ नुसार दि.२७.०३.१९८१ रोजी विद्युत पुरवठा घेतला होता. सदर ग्राहकाने लोड ६५ एच.पी. वरुन २०० एच.पी. पर्यंत वाढवण्यात आला. सदरचा लोड हा महावितरण कंपनीच्या १५% सुपरव्हिजन योजने अंतर्गत ग्राहकाने घेतला होता. सदर वाढीव वीज पुरवठा करतेवेळी महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करण्यात आली होती. सदर ग्राहकांचा वीज पुरवठा दि.२०.२.२०१७ रोजी कायमचा बंद करण्यात आला.

सदर वाढीव भार प्रकरणाचा मंजुरी क्र.EE/UCR/JLG/T-II/९०८५ दि.२१.०९.२००६ असा आहे.त्यामधील अट क्र.४५५ Acceptance नुसार अटी व शर्थी मान्य असल्यानंतर ग्राहकाने वाढीव भार आणि डिमांड्नोट दि.१९.०७.२००७ भरलेली आहे. (पावती क्र. ०४७०१४० दि.१९.०७.२००७) महावितरण कंपनीच्या १५% सुपरव्हिजन योजने नुसार ग्राहकाला वीजपुरवठा केल्यानंतर मंजुरीनंतर महवितरणच्या १५% सुपरव्हिजन चार्जेसनुसार ग्राहकाकडुन व ग्राहकाच्या संमंतीने करारनामा केल्यानंतरच वाढीव भार अथवा वीजपुरवठा करण्यात येतो. तसेच १५% सुपरव्हिजन परिपत्रकानुसार व महावितरण व पुर्वीचे मंडळाच्या प्रचलीत नियमानुसार वीज जोडणीसाठी लागणारे साहित्य महावितरण व पुर्वीचे मंड्ळाकडे हस्तांतरीत होते.

सदर विद्युत रोहित्र हे महावितरण कंपनीला हस्तांतरीत होते. त्यानुसार २०० के.व्ही.ए.चे रोहीत्र महावितरण कंपनीस हस्तांतरीत केले गेले. नोव्हेंबर २०११ ला जळगाव विभागाचा कार्यभार हा क्रॉम्पट्न ग्रिव्हज कंपनी (MSEDCL Distribution Franvhisee) हस्तांतरीत झाल्यामुळे ग्राहकाचा करारनामा सद्यस्थितीत या कार्यालयात उपलब्ध नाही.

सदर ग्राहकाने उच्च्दाब विद्युत पुरवठा घेतल्यामुळे ग्रा.क्र.११००१०००८११५ चा विद्युत पुरवठा कायमचा खंडीत करण्यात आला.

अट क्र.४४४ Space for equipments नुसार ग्राहकाने म. रा.वि.वि.कं.मर्या. नवीन वाहिनी अथवा रोहित्र उभारणीसाठी लागणारी तसेच मिटर बसवण्यासाठी लागणारी जागा उपलब्ध करुन देणे नमुद केले आहे. परंतु सदर प्रकरणी वाढीव वीज भारासाठी मंजुर केलेले २०० के.व्ही.ए. चे रोहित्र हे ग्राहकांच्या जागेवर बसविण्यात आलेले नसुन महावितरणच्या वीजप्रणाली मध्ये बसविण्यात आलेले होते. तसेच रोहित्र बसवल्यापासुन ते ग्राहकाच्या वीजपुरवठा कायमचा खंडीत करेपर्यंत सदर रोहित्राची देखभाल व दुरुस्ती महावितरण (MSEDCL Distribution Franchisee) कडुन करण्यात आलेली आहे.

तसेच ORC योजनेच्या परिपत्रकानुसार १५% सुपरव्हिजन अंतर्गत ग्राहकाने स्वखर्चाने वाढीव वीज भारासाठी लागणाऱ्या रोहित्राचे काम केलेले आहे. त्यासाठी ग्राहकाकडुन कोणत्याही प्रकारचे एस.एल.सी चार्जेस घेण्यात आले नव्हते. सदर घटणा ही दोन वर्षा पुर्वीची आहे.

अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष मंडळ कार्यालय जळगाव यांनी दिलेले आदेशाद्वारे (आदेश क्र. ००४९३२ दि.२८.०८.२०१७) अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे.

**अंतर्गत तक्रार निवारण कक्षाची कार्यवाही :-**

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, जळगाव मंडल, कार्यालय येथे तक्रारीची दि. १९.०४.२०१७ रोजी सुनावणी होऊन दि. २८/०८/२०१७ च्या पत्रान्वये रोजी पुढीलप्रमाणे निर्णय देण्यात आलाः

१. *"सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे."*

**मंचाचे निष्कर्ष :**

तक्रारदाची तक्रार, दाखल कागदपत्रे विजवितरण कंपनीचे म्हणने व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की,

१. कार्यकारी अभियंता जळगाव यांनी Additional LT Power Supply देतेवेळी त्यांचे पत्र क्र.EE/UCR/JLG/T-II/९०८५ Dt.२१.०९.२००६ मधील अट क्र.४४४ Space for equipments नुसार ग्राहकाने म.रा.वि.वि.कं.मर्या. नवीन वाहिनी अथवा रोहित्र उभारणीसाठी लागणारी तसेच मिटर बसवण्यासाठी लागणारी जागा उपलब्ध करुन देणे नमुद केले आहे. परंतु सदर प्रकरणी वाढीव वीज भारासाठी मंजुर केलेले २०० के.व्ही.ए. चे रोहित्र हे ग्राहकांच्या जागेवर बसविण्यात आलेले नसुन महावितरणच्या वीजप्रणाली मध्ये बसविण्यात आलेले होते. तसेच रोहित्र बसवल्यापासुन ते ग्राहकाच्या वीजपुरवठा कायमचा खंडीत करेपर्यंत सदर रोहित्राची देखभाल व दुरुस्ती महावितरण (MSEDCL Distribution Franchisee) कडुन करण्यात आल्याचे दिसते.
२. ORC योजनेच्या परिपत्रकानुसार महावितरणने ग्राहकाकडुन Supervision Charges @15 % on Labour Component घेतल्यामुळे ग्राहकाने स्वखर्चाने वाढीव वीज भारासाठी लागणाऱ्या रोहित्राचे काम केल्याचे दिसते.

ग्राहकाचे प्रतिनिवेदन, विद्युत वितरण कंपनीचा खुलासा व सादर करण्यात आलेली कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करुन मंच या प्रकरणी खालील निर्णय देत आहे.

कार्यकारी अभियंता म.रा.वि.कं. जळगांव तक्रार निवारण मंच

**निर्णय**

१. मंच सदर गाऱ्हाणे निकाली (फेटाळत) काढीत आहे.
२. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील विनियम क्र. ६.१२ नुसार नोडल अधिकारी यांनी या आदेशाच्या पूर्ततेचा व आदेशातील दखल पात्र निष्कर्ष यांवरील कारवाईचा अहवाल मंचाकडे एक महिन्यात सादर करावा.
३. निर्देशित कालावधीत वितरण कंपनीने या आदेशाची अमंलबजावणी न केल्यास म.वि.नि.आ. (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. २२ अन्वये तक्रारदार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागू शकतात.
४. या निर्णया विरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. १७.२ नुसार मा. विद्युत लोकपाल यांचेकडे , (व्दारा – महाराष्ट्र वीज नियामक आयोग, ६०६ "केशवा" बंगला, बांद्रा कॉम्पलेक्स (पुर्व) मुंबई– ४०००५१) येथे या आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसाच्या आत ते अपील करु शकतात.

सही– सही–
धनंजय किसन मोहोड चंद्रकांत मोहन येशीराव
सदस्य-सचिव तथा कार्यकारी अभियंता सदस्य.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः**

१. मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.(मर्या.),विद्युत भवन, परिमंडळ कार्यालय, जळगांव
२. अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.(मर्या.) मंडळ कार्यालय,जळगांव

सदस्य-सचिव/कार्यकारी अभियंता
म. रा. विज वितरण कंपनी मर्यादित
ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
परिमंडळ, जळगांव